ZPAHM-16013(11)/15/2025-HEALTH I/2829382/202

शिक्षा अंतिम करणेबाबत.
श्री.संजय बारकु चौधरी, आरोग्य सेवक पुरुष, प्राथमिक आरोग्य केंद्र- अस्तगांव, ता.राहाता, जि.अहिल्यानगर यांचे गैरवर्तनाबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक- आरोग्य/आस्था-३/७०३८/२०२६
अहिल्यानगर, दिनांक- २६/१०/२०२६

संदर्भ :- १. वैदयकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र-अस्तगांव, ता.राहाता यांचे कडील दोषारोप पत्र क्र. आरोग्य/आस्था/९२१/२०२३, दि. १०/१०/२०२३
२. इकडील दोषारोप पत्र जा.क्र. वशि/आस्था-३/२२२/२०२४, दि.१०/०८/२०२३
३. श्री.संजय बारकु चौधरी, आरोग्य सेवक पुरुष यांचा दि. २९/०४/२०२४ रोजीचा खुलासा
४.सादरकर्ता व चौकशी अधिकारी यांची नेमणुक इकडील आदेश क्र. आरोग्य/आस्था-३/०१७२०/२८०/२०२४, दि.२१/०५/२०२४
५.सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचे कडील खाते निहाय चौकशी अहवाल क्र. . विशा-४/खाचौ/सी.आर.८६/२०२४, दिनांक- २३ जानेवारी २०२५
६.या कार्यालयाकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र. आरोग्य/आस्था-३/७२५/२०२५, दिनांक- १८/०८/२०२५
७. श्री.संजय बारकु चौधरी, आरोग्य सेवक पुरुष यांचा दिनांक- १८/०८/२०२५ रोजीचा खुलासा
८. वैदयकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र-अस्तगांव यांचेकडील पत्र क्र. आस्था/२१/२६, दिनांक- ०५/०१/२०२६
९.महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम ३
१०.महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील नियम ४ (१)

तुम्ही प्राथमिक आरोग्य केंद्र-प्रा.आ.केंद्र-अस्तगांव, ता.राहाता, जिल्हा अहिल्यानगर येथे आरोग्य सेवक पुरुष या पदावर कार्यरत असताना कर्तव्याचे ठिकाणी दिनांक-०८/०८/२०२३ ते दिनांक-१८/०९/२०२३ या कालावधीत अनाधिकृत गैरहजर, अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयीन कामी धमकी देणे, वरिष्ठांचा आदेशाचा अवमान करणे व सहा राष्ट्रीय कार्यक्रमाची अंमलबजावणी न करणे या सारखे कार्यालयीन कामकाजात गैरवर्तन व कर्तव्यात कसुर केल्याने या कार्यालयाचे उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये तुम्हांस दोषारोपाचे ज्ञापन विविरणपत्र क्र. १ ते ४ बजावणेत आले होते. सदरचे दोषारोपाबाबत तुमचा खुलसा संदर्भ क्र. ३ अन्वये या कार्यालयास प्राप्त आहे. तुमचे विरुध्द ज्ञापन/दोषारोप ज्ञापनान्वये ठेवण्यात आलेले आरोप खुलास्यात अमान्य केलेले असल्याने न्याय हक्काचे दृष्टीने खातेनिहाय चौकशी करणेचे निश्चित करण्यात आलेले होते. त्यानुसार या कार्यालयाकडील संदर्भ क्र.४ अन्वये विभागीय चौकशी सुरु करणेकामी सादरकर्ता व चौकशी अधिका-यांची नेमणुक करणेत आली होती.

त्याअनुषंगाने संदर्भ क्र.५ अन्वये सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेकडुन चौकशी पुर्ण होवून चौकशी अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला आहे. सदर विभागीय चौकशी अहवाला मध्ये तुमचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप पत्रा मधील तीनही आरोप विभागीय चौकशीमध्ये सिध्द झालेले आहेत. विभागीय चौकशीमध्ये दोषारोपांबाबत खालील प्रमाणे निष्कर्ष नोंदविले आहेत.

आरोप क्र.१- विनापरवानगी कार्यालयीन कामी अनाधिकृत गैरहजर राहणे.

निष्कर्ष - तुम्ही दिनांक- ०८/०८/२०२३ ते दिनांक- १८/०९/२०२३ या कालावधीत उपकेंद्र राजूरी येथे गैरहजर होते. हजेरीपत्रकावर त्यांनी केवळ एक दिवस स्वाक्षरी केल्याचे दिसून येते. या कालावधीत तुम्ही तुमचे नियमित काम (थुंकी तपासणे, मलेरिया सर्व्हे इ.) केलेले नाही. त्यामुळे वैदयकीय अधिका-यांकडे गैरहजेरीबाबत अहवाल सादर केलेला नसल्याचे साक्षीदार यांनी चौकशी प्राधिकरणासमोर स्पष्ट केले आहे. तुम्ही आरोपपत्रास खुलासा सादर केला असून कारणे दाखवा नोटीसचा खुलासा सादर केला नसल्याचे स्पष्ट होते. यावरुन तुम्ही उपकेंद्र राजूरी येथे कार्यरत असतांना आरोपात नमूद कालावधीत विनापरवानगी गैरहजर असल्याचे व कामकाज केले नसल्याचे साक्षीदारांच्या साक्षीवरुन दिसून येते. मात्र तुम्ही सादर केलेल्या फोटोच्या पुराव्यावरुन तुम्ही कार्यक्रमास हजर असल्याचे दिसून येते. त्यामुळे अपचारी यांच्या बचाव निवेदनात अंशतः तथ्य दिसून येते. सबब, सदर आरोप चौकशीअंती अंशतः सिध्द होत असल्याचा निष्कर्ष नोंदविले आहे.

आरोप क्र.२- अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयीन कामी धमकी देणे.

निष्कर्ष - तुम्ही आरोपपत्रास खुलासा सादर केला असून कारणे दाखवा नोटीसचा खुलासा सादर केला नसल्याचे स्पष्ट होते. यावरुन तुम्ही उपकेंद्र राजूरी येथे कार्यरत असतांना आरोपात नमूद केल्या प्रमाणे वैदयकीय अधिकारी व समुदाय अधिकारी यांनी वेळोवेळी अपचारी यांनी दिलेल्या धमक्यांबाबत वरिष्ठांना कळविल्याचे दस्तऐवाजावरुन स्पष्ट होते. तसेच श्री.गाडेकर यांना चाकु दाखवून जीवे मारण्याची धमकी देणे यासारखे गैरकृत्य केल्याने सदर बाबत अपचारी यांचेविरुध्द राहाता पोलीस स्टेशन येथे सी.आर.पी.सी.१५५ अंतर्गत एन.सी.आर. नोंदविण्यात आल्याचे दस्तऐवजावरुन दिसून येते. त्यामुळे तुमच्या बचाव निवेदनात तथ्य दिसून येत नाही. सबब, सदर आरोप चौकशी अंती सिध्द होत असल्याचा निष्कर्ष नोंदविले आहे.

आरोप क्र.३- वरिष्ठांचा आदेशाचा अवमान करणे.

निष्कर्ष - तुम्ही आरोपपत्रास खुलासा सादर केला असून कारणे दाखवा नोटीसचा खुलासा सादर केला नसल्याचे स्पष्ट होते. या वरुन अपचारी यांनी उपकेंद्र राजूरी येथे कार्यरत असतांना आरोपात नमूद केल्याप्रमाणे तुम्ही कारणे दाखवा नोटीसचे खुलासे सादर केले नसून कारणे दाखवा नोटीस स्विकारल्या नसल्याचे दस्तऐवजावरुन दिसून येते. तुम्ही कर्तव्यात कसूल केलेचे व वरिष्ठांच्या आदेशाचा अवमान केल्याचे सिध्द होते. त्यामुळे अपचारी यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा

(वर्तणूक) नियम १९६७ च्या नियम ३ चे उल्लंघन केले असल्याचे सिध्द होत असल्यामुळे ते महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ नुसार शिस्तभंगविषयम कारवाईस पात्र ठरत असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे तुमच्या बचाव निवेदनात तथ्य दिसून येत नाही. सबब, सदर आरोप चौकशीअंती सिध्द होत असल्याचा निष्कर्ष नोंदविले आहे.

आरोप क्र.४- सहा राष्ट्रीय कार्यक्रमाची अंमलबजावणी न करणे.

निष्कर्ष - तुम्ही आरोपपत्रास खुलासा सादर केला असून कारणे दाखवा नोटीसचा खुलासा सादर केला नसल्याचे स्पष्ट होते. या वरुन तुम्ही उपकेंद्र राजूरी येथे कार्यरत असतांना आरोपात नमूद केल्याप्रमाणे अपचारी हे दिनांक-१८/०८/२०२३ रोजी उपकेंद्र-राजूरी येथे लसीकरणास गैरहजर राहिल्याचे दिसून येते. तसेच आरोग्य सेवेतील महत्वाच्या सहा राष्ट्रीय कार्यक्रमामध्ये दिलेल्या उद्दिष्टांची पुर्तता त्यांनी केलेली नसल्याचे स्पष्ट होते. तुमचेकडून आरोग्य सेवा देण्यात हजगर्जीपणा झालेला असून कार्यालयीन कामी दुर्लक्ष केलेले असल्याचे दिसून येते. . त्यामुळे तुम्ही महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ च्या नियम ३ चे उल्लंघन केले असल्याचे सिध्द होत असल्यामुळे ते महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ नुसार शिस्तभंगविषय कारवाईस पात्र ठरत असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे तुमच्या बचाव निवेदनात तथ्य दिसून येत नाही. सबब, सदर आरोपचौकशीअंतीसिध्दहोतअसल्याचा निष्कर्ष नोंदविले आहे.

आरोप क्रमांक	निष्कर्ष
आरोप क्र.१	आरोप अंशतः सिध्द होतो
आरोप क्र.२	आरोप सिध्द होतो
आरोप क्र.३	आरोप सिध्द होतो
आरोप क्र.४	आरोप सिध्द होतो

सबब, सदर आरोप चौकशीअंती १-अंशतः सिध्द व ३-सिध्द होत असल्याचा निष्कर्ष नोंदविले आहे.

या बाबत संदर्भ क्र. ६ अन्वये, विभागीय चौकशीमधील निष्कर्षाशी हे प्राधिकरण सहमती दर्शवित तुमचे विरुध्द ठेवलेल्या दोषारोप प्रपत्रातील आरोप सिध्द होत असलेने तुम्ही महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील ३ चा भंग केल्याचे सिध्द होते. सबब महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील नियम ४ (७) नुसार सेवेतून बडतर्फ करणे अशी बडतर्फी सामान्यतः भावी नोकरीसाठी अपात्रता ठरेल अशी शि का करणेत येऊ नये? या बाबतचा खुलासा सदरची अंतिम कारणे दाखवा नोटीस मिळाल्यापासुन सात दिवसाच्या आत या कार्यालयास सादर करावा. मुदतीत खुलासा सादर न केल्यास यावाबत आपले काहीही एक म्हणणे नाही. असे समजुन तुमचेविरुध्द नोटिसेत नमूद पुढील प्रशासकीय कारवाई करण्यात येईल. यांची नोंद घ्यावी. असे कळविणेत आले होते.

ZPAHM-16013(11)/15/2025-HEALTH

I/2829382/202

त्या अनुषंगाने संदर्भ क्र.७ नुसार, श्री.संजय बारकु चौधरी, आरोग्य सेवक (पुरुष), यांनी दिनांक- १८/०८/२०२५ रोजीच्या पत्रात खुलासा सादर केलेला आहे. तसेच संदर्भ क्र.८ चे पत्रानुसार वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र- अस्तगांव यांनी श्री.चौधरी यांचे कामात सुधारणा झाली असलेचे कळविले आहे.

विभागीय चौकशी अहवालातील सर्व सिध्द आरोप व श्री.चौधरी यांनी दिलेला खुलासा पहाता महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील नियम ४ (१) नुसार ---------उपका---------डेबाडे---------
---------- ही शिक्षा अंतिम करणेत येत आहे.

या आदेशाची नोंद श्री.संजय बारकु चौधरी, आरोग्य सेवक (पुरुष), यांच्या मूळ सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक 20261026100132 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 26-10-2026 18:24:37
(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.संजय बारकु चौधरी, आरोग्य सेवक पुरुष
व्दारा व प्रत :- वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र- अस्तगांव, ता.राहाता, जि.अहिल्यानगर

२/- सदर आदेश श्री.संजय बारकु चौधरी, आरोग्य सेवक पुरुष, यांना बजाविण्यात येवुन त्यांच्या दिनांकित स्वाक्षरीची पोहच प्रत या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

प्रतः- गट विकास अधिकारी पंचायत समिती राहाता, ता.राहाता, जि.अहिल्यानगर
प्रतः- तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती राहाता, ता.राहाता, जि.अहिल्यानगर
प्रतः- मुख्य वित्त व लेखा अधिकारी, जि.प.अहिल्यानगर

स्वाक्षरी/-
(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर